# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल:
pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि / निवि / ३७ दिनांक : १७ / ०७ / २०१७

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : वार्षिक अहवाल सन २०१६—१७ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत. ( दि. १ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ पर्यंत)**

महोदय / महोदया,

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रतिवर्षी वार्षिक अहवाल तयार केला जातो. वार्षिक अहवालासाठी आवश्यक असणारी सन २०१६—१७ ची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणे अनिवार्य आहे. सदरहू वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या माहितीचा उपयोग शासन स्तरावर वेगवेगळया कामाकरिता केला जातो. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये सदर अहवाल मंजूरीसाठी पाठवावा लागतो व त्यास दोन्ही सभागृहाची मंजूरी घ्यावी लागते.

सदर माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी सोमवार, दि. १७ जुलै, २०१७ ते मंगळवार, दि. ३१ आक्टोबर, २०१७ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानंतर वार्षिक अहवाल भरण्यासाठी कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. तसेच वार्षिक अहवाल माहिती भरल्याशिवाय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाहीत.

वार्षिक अहवालाकरिता आपणाकडून मागविण्यात आलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने भरली नाही तर शासनाकडून आपणास मिळणारे अनुदान, इतर सवलती देण्याविषयी अडचणी निर्माण होतील. यासंदर्भात मा.व्यवस्थापन परिषदेमध्ये क्र.२४५/१२०९१२ अन्वये असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ कार्यालयाने वेळोवेळी मागणी केलेली माहिती न देणे ही गंभीर बाब असल्याने यापुढे मागविलेली माहिती वेळेत भरणे अपेक्षित आहे. **अन्यथा महाविद्यालयाकडून / संस्थेकडून येणारे संलग्नीकरण, नूतनीकरणाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत व सदर महाविद्यालय / संस्था गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत मिळणा—या अनुदानास पात्र राहणार नाहीत.**

वार्षिक अहवालाची माहिती सादर करताना ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची एक हार्ड कॉपी नियोजन व विकास विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

**ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे**

unipune.ac.in – Home page - BCUD Online – Login – For College Users – College Login & Password – Annual Report 2016-17

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

प्रत —
मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७